# अमरावती शहर दैनंदिन गुन्हे अहवाल दिनांक २२/१०/२०२३ चे ००.०१ ते १६.०० वा.

## दुखापत

| अ. क्र. | पो.ठाणे अप.क्र. व कलम | घटना स्थळ | गु.घटना ता व वेळ माहिती ता.वेळ गु.दाखल ता. वेळ | फिर्यादीचो नांव पत्ता व संपर्क क्र. | आरोपीचे नाव व पत्ता | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | पो.स्टे.फ्रेजर पुरा अम.शहर अप क्र. ८९८/२०२३ कलम ३२६,३४ भादवि | यशोदा नगर चौक अमरावती | दि.२१/१०/२० २३चे १९.४५ वा<br><br>दा.ता.वेळ दि.२२/१०/२० २३ चे ००.४७ वा | संजय हरिभआउ गायबले रा. यशोदा नगर नं. प्रिया प्रोव्हिजन जवळ अमरावती | १) रोहीत गजघाटे वय १९ वर्ष, रा. यशोदा नगर नं.१ अमरावती, २)गोलु भिमराव रामटेके वय २५ वर्ष, रा. यशोदा नगर नं.१अमरावती, ३) पुर्ण नाव माहीती नाही रा.यशोदा नगर , ४) आणखी एक जण नाव माहीती नाही | हकीकत अशा प्रकारेआहे की. नमुद घ.ता.वेळि व ठिकाणी यातील फिर्यादी हे त्याचे भाजीपालाची गाडी लावली असता भाजीपाला विकत असतांना यातील चारही आरोपी हे फिर्यादीच्या जवळ आले व यातील आरोपी क्र. १ व २ हे फिर्यादीचे मागु येवुन फिर्यादीच्या ढुंगणावर चाकुन दोन्ही बाजुने वार करुन फिर्यादीस जखमी केले व आरोपी क्र. ३,४ यांनी फिर्यादीस पकढुन ठेवले होते फिर्यादीला चाकुने वार केल्यामुळे रक्त विघाल्यामुळे नमुद आरोपी हे तेथुन पळुन गेले फिर्यादी यांनी आरडोओरडा केला असता बाजुला फिर्यादीचे भाउ सुभाष हरिभाउ गायबोले हा त्याच्या स्वताच्या भाजीपाला गाडीजवळुन फिर्यादी जवळ आला व तेथील अक्षय डोईफोडे व सोन्या कानझोडे , आदित्या वानखडे , अंकुश कोठेकर हे तेथे आले व फिर्यादीस जखमी अवस्थेत पो.स्टे. फ्रेजरपुरा येथे नेने व तेथुन पोलीसांनी फिर्यादीस उपचारा करिता सामान्य रुग्णालय अमरावती येथे वार्ट कर्.३० मध्ये भरती केले सध्या फिर्यादीचा उपचार सुरु आहे काल दि. २०/१०/२०२३ रोजी राजासाहेबर वार जुना बायपास अमरावती येथे फिर्यादीचा मुलगा नामे यश संजय गायबोले यांचे शुभम भिमराव रामटेके यांचे सोबत भांडण झाले होते त्या कारणावरुन आज रोजी फिर्यादीस चाकुणे वार करुन जखमी केले अशा फिर्यादीच्या जबाणि रिपोर्ट वरुन सदरचा गुन्हा दाखल |
| २ | पो.स्टे. फ्रेजरपुरा अम.शहर अप क्र. ८९९/२०२३ कलम ३२६,३४भा दवि | संजय गांधी नगर नं. १ चौबे बिच्छायत केंद्र अमरावती | दि. २१/१०/२०२३ चे २१.३० वा<br><br>दि.ता.वेळ दि.२२/१०/२० २३े ०१.१३ वा | गोविंद अमृतराव गेडाम धंद्दामजुरी, रा. संजगांधी नगर नं.१ जुना बायपास रोड अमरावती | तीन अनोळखी इसम नाव माहीती नाही | हकीकत अशा प्रकारे आहे की, नमुद घ.ता.वेळि व ठिकाणी यातील फिर्यादी हे त्याचे पत्नि सौ नर्मदा गोविंद गेडाम वय ६५ वर्ष यांच्यासह घरी असता तीन इसम वय अंदाजे २० ते २५ वयोगटातील तोडाला दुपट्टे बांधुन आले व फिर्यादीला विचारले की, काल्या कुठे आहे त्यावरर फिर्यादीने म्हटले की, काल्या आमच्या घरात राहत नाही त्याचा पत्ता मला माहीती नाही असे म्टले असता त्यातील एक धाडधाक्कट जाडजुड्या इसमाने फिर्यादीवर चाकुने हमला केला तसेच दुसऱ्या मुलाने फिर्यादीचे पत्निला उजव्या मांडीवर चाकुने वार केला तसेच त्याचा सोबत तिसरा मुलगा सुध्दा धाडधक्कड होता ते तिन्ही इसमएकाच टुव्हीलर वर बसुन आले होते काल्या हा फिर्यादीचा नातु आहे त्याचे नाव रोहीत प्रभाकरराव गजघाटे वय १९ वर्ष, राय यशोदा नगर त्ाचा व आमचा काही सबंध नाही फिर्यादीचे घरी येवु जेत नाह त्याने यशोदा नगर चौकात आज दि. २१/१०/२०२३ रोजी अंदाजे १९.४५ वा. संजय हरिभाउ गायबोले याला त्याच्या मित्राच्या मदतीने जखमी केले काल्या हा फिर्यादचे नातेवाईक असुन या संशयावरुन तिन्ही आरोपीने फिर्यादीव फिर्यादीचे पत्निवर चाकुने वार करुन हमला केला आहे अशा फिर्यादीचे जबाणि रिपोर्ट वरुन सदरचा गुन्हा दाखल |

## चोरी

| अ. क्र. | पो.ठाणे अप.क्र. व कलम | घटना स्थळ | गु.घटना ता व वेळ माहिती ता.वेळ गु.दाखल ता. वेळ | फिर्यादीचो नांव पत्ता व संपर्क क्र. | आरोपीचे नाव व पत्ता | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | नागपुरी गेट अप क्र ५४६/२०२३ कलम ३८०,४५७ भादवि | क फिचे राहते घरी असाबे स्कुल मदरचा जवळ अम. | 19/10/2023 चे १६/०० वा ते २२/१०/२०२३ चे ०५/०० वा | बाबा शाह सुलेमान शाह रा असाबे सुफा लालखडी अमरावती | अज्ञात | थोडक्यात हकीकत अशा प्रकारे आहे की यातील फिर्यादी यांनी घरबांधण्यासाठी व किराणा माल घेण्यासाठी जमा केलेले ९००००/- रु एक लोखंडी पेटी मध्ये घरात ठेवले असता दि. १९/१०/२०२३ रोजी फिर्यादी यांनी मोबाईल रीचार्ज करण्यासाठी लोखंडी पेटी मधुन ठेवलेल्या पैस्या मधुन ५०० रु काढले असता नमुद घटना ता वेळी ठीकानी फिर्यादी नमाजाला उठला असता त्यांनी घरातील लाईट चालु व घराचा दरवाजा उघडा दिसला असता फिर्यादीला शक आला की घरामध्ये कोणीतरी आले व फिर्यादी ने घरातील लोखंडी पेटी चेक केली असता पेटी मध्ये ठेवलेले ८९५००/- रु दिसले नाही सदर पैशाबाबत फिर्यादी यांनी पत्नी हीला विचारपुस केली असता त्यांनी असे सांगीतले की मला माहीत नाही फिर्यादीच्या सांगण्यावरुन कोणीतरी अज्ञात चोराने चोरुन नेले अशा फिर्यादीचे जबानी रीपोर्ट वरुन सदरचा गुन्हा दाखल |
| २ | पोस्टे राजापेठ अप क्रं. ९२३/२०२३ कलम ३७९ भादवी | अमरावती | दि २१/१०/२३ चे २१-०० वा. ते २३-१५ वा. दरम्यान दा. ता. वेळ २२/१०/२३ चे ०३ -५४ वा. | एक महीला | अज्ञात | हकीकत अश्या प्रकारे आहे की फिर्यादी हि गरबा खेळण्याकरीता खंडेलवाल लॉन्स येथे तिच्या ज्युपीटर गाडीने गेली. पार्कीगमध्ये खुप गर्दी असल्याने गाडी खंडेलवाल लॉन्स चे समोर मेन रोड लगत लावली. फिर्यादीने तिच्या जवळ असलेले 1)MI कंपनीचा Xieome 11 I 5 G मोबाईल ज्याचा IMEI 1) 869406054400071, 2) 869406054400089 ज्यामध्ये Airtel सिमकार्ड कि.अं. 8000 रू., 2) Oppo कंपनीचा F19 मोबाईल ज्याचा IMEI माहित नाही ज्यामध्ये Airtel सिमकार्ड, Jio सिमकार्ड कि.अं. 2000 रू. असा एकुन १०,००० रू. चे मोबाईल गरबा खेळतांना अडचण होईल म्हणुन गाडीच्या डिक्कीत पर्स मध्ये चालु स्थितीत ठेवुन गाडीची डिक्की व्यवस्थीत बंद केली व लॉनच्या आत गरबा खेळण्याकरीता गेली ११-१५ वा. गरबा खेळुन झाल्यावर गाडीजवळ आली असता गाडीची डिक्की उघडण्याकरीता चाबी लावली असता डिक्की आधीच उघडी होती. पर्समध्ये वरील नमुद मोबाईल पाहिले असता मोबाईल दिसुन आले नाही. गरबा खेळुन जाणा-या एका महिलेच्या मोबाईल वरून दोन्ही क्रमांकावर फोन केला असता फोन बंद दाखवित होते. ते मोबाईल कोणीतरी अज्ञात चोराने गाडीची डिक्की उघडुन चोरून नेले. अश्या फि.जबानी रिपोर्ट वरुन सदरचा गुन्हा डीओ आदेशाने दाख़ल |
| ३ | पो ठाणे सिटी कोतवाली अप क्र.४७५/२०२३ कलम ३७९ भादवी | अमरावती | दि.२१.१०.२३ चे १२.१० वा ते १२.४५ वा दरम्यान दि२२.१०.२३ चे सकाळी ००.ॉ८ वा | एक महीला | अज्ञात | हकिकत अशा प्रकारे आहे की, समक्ष पो.स्टे ला येवुन रिपोट देते की अर्जदार हे दि.२१.१०.२३ चे १२.१० वा चे सुमारास अंबादेवी दर्शनाकरीता अंबादेवी मंदीर येथे आल्या त्यानंतर त्या एकवीरा देवी दर्शनाकरीता ते १२.४५ वा चे सुमारास बाहेर आले अलता फिर्यादी यांचे गळ्यात असलेले सोन्याचे मगळसुत्र यांनी पाच वर्षापुर्वी ७५,००० रु ला घेतलेले सोन्याचे मगळसुत्र ज्यामध्ये दोन डोरले असलेले २५ ग्रॅम चे सोन्याचे जुने वापरते दिसुन आले नाही म्हणुन मी तेथे कर्तव्यावर असणा-या पोलीसाकडे गेली असता त्यांनी मंदीर प्रशासनाला सीसीटीव्ही फुटेज पाहण्यास सांगीतले फुटेज मध्ये अंबादेवी मंदीरात प्रवेशकरीत असतांना माझे गळ्यात मंगळसुत्र होते जेव्हा बाहेर निघाली तेव्हा माझे गळ्यात मंगळसुत्र आहे किंवा नाही हे स्पष्ट दिसत नव्हते तेव्हा मी रिपोट देणे करीता राजापेठ पो.स्टे ला गेली असता तेथील पोलीस हे घटनास्थळी गेले असता परत येवुन सांगीतले की आम्ही सीसीटीव्ही बघितले आहे तुम्ही एकविरा देवी मंदीरात जात असतांना तुमच्या गळ्यात मंगळसुत्र नाही करीता आपण कोतवाली पोलीस स्टेशन कोतवाली जावुन रिपोट करा म्हळुन मी पो.स्टे कोतवाली येथे येवुन चोरट्याविरुध्द कायदेशार कार्यवाही करणे करीता रिपोट देत आहे अशा फि चे जबानी रिपोट वरुण व डि ओ सा यांचे आदेशाने सदरचा गुन्हा दाखल |

## चोरी

| अ. क्र. | पो.ठाणे अप.क्र. व कलम | घटना स्थळ | गु.घटना ता व वेळ माहिती ता.वेळ गु.दाखल ता. वेळ | फिर्यादीचो नांव पत्ता व संपर्क क्र. | आरोपीचे नाव व पत्ता | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | पो.स्टे सिटी कोतवाली अप क्र ४७६/२०२३ कलम ३७९ भादवी | राजकनल चौक अमृततुल्य अमरावती | दि.२१/१०/२३ चे २२.३० वा दरन्यान दाखल ता.वेऴ दि.२२/१०/२३ चे ०१.१८ वा | अविनाश बॅरीस्टरसिंह ठाकुर वय ३० वर्ष रा किरण नगर गल्ली नं ०६ अमरावती | अज्ञात | हकीकीत अशाप्रकारे आहे की मी समक्ष पो.स्टे ला येवुन रिपोट देतो की माझे भाउ शेलेन्द्र सिंह यांनी सन २०१४ मध्ये हिरोहोन्डा स्पेन्डर प्रो गाडी क्र MH-२७BA १६०८ जिचा ईंजीन नं HA१०ELDHM४२८७२,चेचीस नं MBLHA१०१३BHN११७६४काळ्या रंगाची लाल पट्याची श्रेयश मोटरर्स मधुन नविन विकत घेतली होती ती गाडी मी व माझा भाउ वापरत होतो दि.२१/१०/२३ चे रात्री १०.३० वा चे सुमारास मी व माझा पुतन्या याला अंबादेवी दर्शानाकरीता नमुद घटना ठिकाणी गाडी उभी करुन दर्शनाकरीता गेलो असता ११.१५ वा परत आलो असता मी गाडी ठेवलेल्या ठिकाणी दिसुन आली नाही आजुबाजुला शोध घेतली मिळुन आली अशा फि चे जबानी रिपोट वरुण व डि ओ सा यांचे आदेशाने सदरचा गुन्हा दाखल |

## अपघात

| अ. क्र. | पो.ठाणे अप.क्र. व कलम | घटना स्थळ | गु.घटना ता व वेळ माहिती ता.वेळ गु.दाखल ता. वेळ | फिर्यादीचो नांव पत्ता व संपर्क क्र. | आरोपीचे नाव व पत्ता | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|
| | पो.स्टे. फ्रेजरपुरा अम.शहर अप क्र. ९०१/२०२३ कलम २७९,३३७, भादवि सह कलमआर/ डब्लु १३४ M.V.Act | माउली बड्डे हॉल समोर अरावती | दि.२१/१०/२० २३ चे ११.०० वा<br><br>दा.ता.वेळ दि.२२/१०/२० २३ चे २.२२ वा | नंदलाल विष्णु चौखांद्रे वय ३८ वर्ष, रा. यशोदा नगर नं. १ गल्ली नं.२ लकडे लाईन मध्ये अमरावती | अज्ञात | हकीकत अशा प्रकारे आहे की, मी समक्ष पो.स्टे. ला येवुन जबाणि रिपोर्ट देतो की, मी वरिल पत्यावर राहते आज दि. २१/१०/२०२३ रोजी मी माझे पत्नि सह जेवन झाल्यावर दस्तुर नगर चौकाकडे वॉकींग साठी जात असतांना नमुद घ.ता.वेळी व ठिकाणी एका टुव्हीलर मागुन आली त्याने धडक दिली त्यामुळे माझ्या हाताला पायाला व डोक्याला मुक्का मार लागला सदर टुव्हीलर चालक तेथुन निघुन गेल त्या टुव्हलर मोबाईल खाळी पडला तो मी पोलीस स्टेशनला आणुन जमा केला सदर वाहनाचा नंबर मला दिसला नाही सदर घटना रात्री ११.०० वा दरम्यान ची आहे त्या अज्ञात चालकाने त्याची गाडी भरधाव वेगाने व लापरवाहीने चालवुन मला जखमी केले व पळुन गेला तरि त्याचेवर कार्यवाही करिता रिपोर्ट देता आहे अशा फिर्यादीचे जबाणि रिपोर्ट वरुन सदरचा गुन्हा दाखल |

## ईतर

| अ. क्र. | पो.ठाणे अप.क्र. व कलम | घटना स्थळ | गु.घटना ता व वेळ माहिती ता.वेळ गु.दाखल ता. वेळ | फिर्यादीचो नांव पत्ता व संपर्क क्र. | आरोपीचे नाव व पत्ता | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | पो.स्टे. फ्रेजरपुरा अम.शहर अप क्र९००/२०२३ कलम ८(ग),२०(ख)(क),२२(क),एन डी पी एस अॅक्ट . | मध्यवर्ती कारागृहाच्या आतील परीसर अमरावती | दि२१.१०.२०२३ चे सांयकाळी १५.३० वा दरम्यान<br><br>दि २२.१०.२०२३ ते ०२.४ वा | सुनिल महादेव फुफरे वय २९ वर्ष व्यवसाय नोकरी रा जेल काटर क्रं ८९ वडाळी रोड अमरावती | अज्ञाात | हकीकत अशा प्रकारे आहे की, यातील फियादी हे दि २१.१०.२०२३ रोजी सकाळी ५.३० वा ते १९.०० वा पर्यत माझी मध्यवर्ती कारागृह अमरावती येथे डयुटी असतांना दुपारी ०३.३० वा सुमारास मी मध्यवर्ती कारागृहातील टावर क०३ येथे पाहारेकरी म्हमुन ड्युटी असतांना मला १४ नंबर ब्रेरेक टे टिनपात्रावर एक लाल रंगाचा चेंडु आढळल्याचा आवाज आला व चेंडु ०३ नंबर तटाचे जवळ पडला तेव्हा लगेच मी वॉकीटॉकी वरुन मेन गेट येथे वरिष्ठ अधिकारी यांना माहीती दिली तर त्याठिकाणी वरिष्ठ अधिकारी एस.ए.गिते यांनी येवुन मला विचारपुस केली व चेंडुचे दुरुन निरिक्षण केल असता सदर चेडुला लाल रंगाचे टेपपट्टीचे आवरण दिसुन आले त्यानंतर त्यआंनी २नंबर तटावरिल गार्डला सदर ठिकाणी चेंडुवर लक्ष ठेवण्या सांगुन मला कारागृहाचे कार्यालयात येण्यासाठी सांगीतले तेव्हा कार्यालयात गेलो व अधिक्षक मॅडम यांना सदर प्रकरणाबाबत माहीती दिली त्यानंतर पोलीस स्टेशनला रिपोर्ट देण्यास सांगीतले असता मीलेखी पत्राव्दारे पोलीस स्टेशन फ्रेजरपुरा येथे माहीती दिली त्यानंतर तरि काही वेळाने पोलीसांनी व पंचाना दाखवुन घटनास्थळी मिळालेल्या चेंडुचे लाल पट्टीचे आवरण काढुन त्यांनी पाहणी केली असता १)ओलसर तपकिरी रंगाचा गांजा नावाचा अमलदी पदार्थ वजन ३०ग्रम,२) पानपराग प्रिमियर पान मसाला निळ्या रंगाची दोन पुड्या व दोन पानबहार निळ्या पुड्या एकुण वजन १०ग्रॅम, ३) जिलेट गार्ड ब्लेड रॅपर , एक फोल्डींग कैची पॅकेट व एक पा रुपयाचा कॉईन एकुन वजन वजन २०ग्रॅम, ४) एक जांभळ्या रंगाचा प्लॉस्टीक टेनिस बॉल आकाराचा चेंडु व लाल टेपपट्टी एकुन वजन २० ग्रॅम असे एकुण मुद्देमाल वजन ८०ग्रॅम दिसुन आले सदर मुद्देमाल सिलबंद करुन घटनास्थळ जप्ती पंचनाम्या प्रमाणे पोलीसांनी ताब्यात घेतला त्यानंतर सर्व पोलीस स्टाफ व मी पो.स्टे. फ्रेजरुरा येथे परत आलो अमरावती कारागृहात कैदी बंदीस असलेले कैदी यांना भेटणे करीता येणारे नातेवाईक किंवा ओळखचि व्यक्ती यांच्या माध्यमातुन संपर्क साधुन कारागृहाच्या बाहेर वडाळी रोड कडे टावर क्रं ३ वरील हा रस्त्या लगत असुन तसेच टावर क्रं २ व ३ समांतर हायवे रोड गेला आहे त्या हायवे रोडचे पुलावरुन कारागृहाचे आतील भागाच अवैध वस्तु फेकण्याचा प्रयत्न काही बाहेरील व्यक्ती करतांत अशा आमच्या गोपनी माहीती नुसार माहीती समजुन आलेले आहे तरी कोणीतरी अज्ञात व्यक्तीने आतील कैद्यासाठी गांजा व पानपराग, पानबहारपुडी , जिलेट गार्ड ब्लेड रॅपर , फोल्डींग कैची व पाच रुपयाचा कॉईन असलेला एक चेंडु प्याकीग करुन कारागृहाचे भितींच्या टतावरुन आत मध्ये फेकला आहे सदर अज्ञात इसमाविरुध्द कायदेशीर कार्यवाही करीता रिपोर्ट देत आहे असा फिर्यादीच्या रिपोक्ट वरुन अप सदरचा दाखल |
| | नांदगावपेठ अप क्र.४२८/२०२३ कलम ४३५ भादवी | डॉ.बनकर यांचे शेत शिवार वाळकी | दि.२२/१०/२०२३ रोजी ०२/०० वा ते ०२/३० वा.दरम्यान<br><br>दा.ता.वेळ दि.२२/१०/२०२३ चे १०/५३ वा. | सब्बुलाल फ्रिरामु इरपाची वय २८ वर्ष रा.खाडे पिंपरीया जि.बैतुल रा.मध्यप्रदेश ह.मु.वाळकी नितीन ठाकरे यांचे शेतात | अज्ञात | हकिकत अशा प्रकारे आहे की, दि.२१/१०/२०२३ रोजी मी माझ्या परिवारासह वाळकी गावालगतच शेतामध्ये हजर होतो.मी डॉ.बनकर यांचे ९ एक्कर शे लागवडीने १,१०,००० रु.मध्ये लागवडीने केले होते.त्यामध्ये मी सोयाबिन व तुर पेरली असता मी सोयाबिन चार दिवस अगोदर सोंगले असता त्यामध्ये सोयाबीन च्या दोन गंज्या लावल्या होत्या.मला मळणी करीता मशिन न भटल्यामुळे ते सोयाबीन काढायचे राहले होते.दि.२२/१०/२०२३ चे ०२/०० वा.ते ०२/३० वा.दरम्यान मी लगवी करणे करीता घराच्या बाहेर आलो असता मला सोयाबीन च्या गंज्जीला आग लागलेली दिसली.व मी गंज्जी जवळ गेलो तर दुसऱ्या पण गंज्जीला आग लागुन पुर्ण जळाली होती.तर मी १०० नंबरवर फोन केला व पोलीसाची गाडी आली व त्यांनी आग्णीशामन यांना फोन करुन गाडी आली व सोयाबीन गंज्जी त्यांनी विझवली .सहा एक्कर ची गंज्जी लावली होती ती पुर्ण जळाली.तिन एक्करची अर्धी गंज्जी जळाली माझ्या सोयाबीनच्या दोन्ही गंज्याना आग लावुन माझे अंदाजे २,००,००० रु.ते २,५०,००० रु.चे कोणीतरी अज्ञात इसमाने सोयाबीनच्या गंज्जीला जाणीव पुर्वक आग लावुन नुकसान केले.करीता पोलीस स्टेशनला येवुन रिपोर्ट देत आहे.अशा फि च्या जबानी रि वरुन सदरचा गुन्हा दाखल |

## अकस्मात मृत्यु

| अ.क्र. | पो.ठाणे मर्ग.क्र. व कलम | घटना स्थळ | मृतकाचे नांव | फिर्यादी | मरणाचे कारण | अकस्मात मृत्यूचे विवरण |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | मर्ग क्र.४४/२०२३ कलम १७४ जा.फौ. | नांदगावपेठ टोलनाका का ते बिझीलँन्ड एन एच ६ रोडवर | एक महीला | लोचा ढिमरा लोगो वय ४६ वर्ष रा.खांडपिंपरीया जि.बैतुल राज्य मध्यप्रदेश ह.मु.नांदगापेठ बिझीलँन्ड | अपघाताने | हकीकत अशा प्रकारे आहे की,फि व त्यांची नातेवाईक हे नांदगावपेठ टोलनाका ते बिझीलँन्ड एन.एच ६ रोडने जात असतांना तेथे अपघात झाल्याने त्यांचा उपचार करीता फि.च्या नातेवाईकास ईर्विन दवाखाना अमरावती येथे दाखल केले असता डाँ.सा.यांनी तपासुन चेक केले असता सदर महीलेस मयत घोषीत केले.अशा फि च्या जबानी रिपोर्ट वरुन व ईर्विन मेमो क्र.११२२/२०२३ वरुन कलम १७४ जा.फौ.प्रमाणे डिओ यांचे आदेशाने सदरचा मर्ग दाखल |